# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील रिक्त असलेली खालीलप्रमाणे पदे नियमित वेतनश्रेणीत भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर त्यांचे अर्ज दि.५/६/२०१५ ते दि. १५/६/२०१५ पर्यत ऑनलाईन पध्दतीने संपूर्ण तपशीलासाह पाठवावे. तसेच ऑनलाईनव्दारे अर्जासोबत नमुद केलेली प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.

**शैक्षणिक अर्हता :-**

| पदाचे नाव | पदसंख्या | विषय | शैक्षणिक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा | वेतन बॅण्ड व ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक (रागांवैम) | ०४<br>अनु जमाती- १<br>विमुक्त जाती (अ)/ भटक्या जमाती (ब.क.ड)-१<br>इमाव-२ | १) पॅथॉलॉली -१<br>२) मायक्रोबायोलॉजी-१<br>३) टि.बी.चेस्ट -१<br>४)फार्माकॉलॉजी - १ | संबंधीत विषयातील मान्यताप्राप्त संस्थेची पदवी व मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदवी व ३ वर्ष सहयोगी प्राध्यापक या पदाचा अनुभव आवश्यक. MCI चे नियमानुसार ४ publications आवश्यक<br>**वयोमर्यादा:- ४५ वर्षे** | ३७४००-६७०००<br>अधिक ग्रेड पे<br>१००००/- |
| सहयोगी प्राध्यापक (रागांवैम) | ०५<br>भटक्या जमाती (क) -१<br>इमाव -३<br>खुले - १ | १.जनरल मेडिसीन-२<br>२.जनरल सर्जरी-२<br>३.ओ.बी.जी.वाय.-१ | संबंधीत विषयातील मान्यताप्राप्त संस्थेची पदवी व मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदवी व ४ वर्ष अधिव्याख्याता या पदाचा अनुभव आवश्यक. MCI चे नियमानुसार २ publications आवश्यक<br>**वयोमर्यादा:- ४० वर्षे** | ३७४००-६७०००<br>अधिक ग्रेड पे<br>९०००/- |
| अधिव्याख्याता (रागांवैम) | १७<br>अनु.जमाती-३<br>विमुक्त जाती (अ)-१<br>भटक्या जमाती (क)-१<br>विमाप्र-१<br>इमाव-६<br>खुले-५ | १. पॅथालॉजी-१<br>२.जनरल मेडिसीन-३<br>३.चेस्ट टी.बी.-१<br>४.त्वचारोग - १<br>५. बालरोग -२<br>६.जनरल सर्जरी- ३<br>७.अस्थिव्यंग - १<br>८.ॲनेस्थेशिया-२<br>९. ओ.बी.जी.वाय-३ | संबंधीत विषयातील मान्यताप्राप्त संस्थेची पदवी व मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदवी.<br>**वयोमर्यादा:- ३५ वर्षे** | १५६००-३९१००<br>अधिक ग्रेड पे<br>६०००/- |
| इंन्टेसिव्हिस्ट (रागांवैम) | ०३<br>अनु.जाती-१<br>अनु.जमाती-१<br>खुले-१ | ट्रामा युनिट आय.सी.यु. | (एमबीबीएस. एम.डी./ डिएन.बी., मेडिसीन) (एमबीबीबीएस., एम.डी./ डी.एन.बी.टीबी.चेस्ट/ टी.डी.डी) (एमबीबीएस, एम.डी./डी.एन.बी. ॲनेस्थिशिया /डी.ए.) एमबीबीएस., डी.ए. नामांकीत हॉस्पीटलमधील इंन्टेसिव्हिस्ट प्रमाणपत्र आवश्यक तसेच किमान ६ महिन्यांचा अनुभव आवश्यक. अशी शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभवाची अट शिथील करण्यात येईल.<br>**वयोमर्यादा:- ३५ वर्षे** | १५६००-३९१००<br>अधिक ग्रेड पे<br>६०००/- |

उपरोक्त पदांकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन निर्णय क्र.एमईएस१५०८/प्र.क्र.९४/०८/वैसेवा-१, दि.७/९/२०११ अन्वये करारपध्दतीने शैक्षणिक पात्रता व अनुभवानुसार पात्र उमेदवारांना प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व अधिव्याख्याता या संवर्गातील पदांवर नियुक्ती देण्यात येईल.

**वयोमर्यादा :-**

- अनुभव व विशेष गुणवत्ताधारकांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथीलक्षम
- उमेदवाराचे वय दिनांक ५/६/२०१५ रोजी किमान १८ वर्षे व कमाल प्राध्यापक-४५, सहयोगी प्राध्यापक-४०, अधिव्याख्याता-३५ व इंन्टेसिव्हिस्ट-३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाची शिथीलता)
- ठाणे महापालिकेच्या सेवेत कार्यरत असणा-या उमेदवारांना वयोमर्यादची अट लागू राहणार नाही.

टिपः- १) उमेदवारांना मुलाखतीत मिळालेले गुण जर समान असतील तर वयाने ज्येष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

२) महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र.मातंस२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.४ फेब्रुवारी २०१३ अन्वये गट अ,ब व क मधील कर्मचा-यांना एमएस-सीआयटी या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे.

३) उमेदवाराने सादर केलेला जातीचा,अनुभवाचा दाखला अथवा इतर कोणताही दाखला बोगस आढळुन आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल व त्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारावर राहील.

४) मागास प्रवर्गातून निवड होणा-या उमेदवारांना सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेच्या अटीस अधीन राहून नियुक्ती देणेत येईल.

५) भरती प्रकियेचा संपूर्ण तपशील ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. त्यासाठी वैयक्तिक स्वरुपात उमेदवारांनी पत्रव्यहार करु नये अथवा संपर्क साधु नये.

६) विहित वयोमर्यादेतील शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांने त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमुद करावा. संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करावे.

७) भारतीय आयुर्विज्ञान परिषद,नवी दिल्ली यांचेकडील नियमावलीनुसार महाविद्यालयात कार्यरत शिक्षकांना रिसर्च पब्लिकेशन लागु करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) (i) शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि.२७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

a. (ii) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

b. (iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

३) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (caste certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (caste validity certificate) साक्षांकीत प्रत मुलाखतीचे वेळेस अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तशी नोंद अर्जामध्ये करणे आवश्यक आहे.

४) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय/परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याचा दिनांकापासुन ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यांत येईल.

५) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/३/२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.१/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि.२८/३/२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद अर्जामध्ये करणे आवश्यक आहे.

६) उमेदवारांनी अर्जासोबत पुढीलप्रमाणे प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. १) वयाचा दाखला, २) अधिवास (Domicile Certificate), ३) एमबीबीएस पदवी प्रमाणपत्र, ४) एमबीबीएस एमएमसी रजिस्ट्रेशन, ५) पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, ६) पदव्युत्तर पदवी एमएमसी रजिस्ट्रेशन, ७) जातीचा दाखला, ८) जात वैधता प्रमाणपत्र, ९) अ.ज./अ.जा.उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Creamy-layer Certificate) नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट दि.३१/३/२०१६ पर्यंत वैध असलेले, १०) प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता व निवासी वैद्यकीय अधिकारी या पदाचे कामक केलेबाबत अनुभवाचा दाखला.

७) वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिका-याचे जात व दिनांक ३१/३/२०१६ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तसे संगणकामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

८)	नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १/११/२००५ नुसार लागु करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागु राहील.

९)	उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर कराव्यात. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधीत उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

१०)	उमेदवाराने शैक्षणिक पात्रता, अनुभव व मुलाखतीत मिळविलेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवडयादी तयार केली जाईल. अंतरिम निवडयादी मधून पदांच्या सामाजिक आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

११)	मुलाखतीचे दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

१२)	स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.

१३)	शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१४)	उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१५)	नियुक्तीपुर्वी निवड झालेल्या उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे व कागदपत्रांची पडताळणी तज्ञ व्यक्तींकडून करण्यात आल्यानंतरच नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

१६)	सदर नियुक्त्यांसाठी परिविक्षाधिन कालावधी दोन वर्षांचा राहील. सदरचा परिविक्षाधीन कालावधीमध्ये वाढ करणे अथवा सेवा संपुष्ठात आणणे याबाबतचा अधिकार महापालिकेने राखून ठेवलेला आहे.याबाबत कोणत्याही उमेदवारास तक्रार अथवा वाद करता येणार नाही.

१७)	उमेदवाराने विहीत अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१८)	सदर जाहिरातीनुसार भरती स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे , प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

१९)	उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

२०)	एखादया अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

२१)	निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल/शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

Sd/-

ठिकाणः ठाणे	उपआयुक्त (मुख्यालय),
दिनांक :	ठाणे महानगरपालिका,
ठाणे.